# शीलस्वभावामध्ये बदल

ईयोब आणि इतरांनी सात्विक सद्‌गुणांमध्ये वाढण्याचा आदर्श ठेवला

मुलांना शिकवणाऱ्यांनी C1b हा अभ्याक्रम वाचावा.

**प्रार्थना,** ''हे पित्या ह्या अभ्यासाचा उपयोग, मला आणि मी ज्यांना ख्रिस्तामध्ये वाढण्यास मार्गदर्शन करतो/करते त्यांना सहाय्य होण्यासाठी करून घे.''

## 1. ख्रिस्तासमान शीलस्वभाव घडवण्याची तयारी करा


### पार्श्वभूमी

ईयोबाने पराकोटीच्या संकटांचा सामना धीराने केला, याविषयी देवाशी वादविवाद केला आणि देवावरील आपला विश्वास दृढ धरून ठेवला.

ईयोब नीतिमान मनुष्य होता, परंतु सर्वसमर्थ देवाला त्याच्या स्वत:च्या रहस्यमय मार्गाने कार्य करू दिले पाहिजे हे त्याला अद्याप शिकायचे होते.

छळ संकटांना विश्वासाने व धीराने प्रतिसाद दिल्याने सात्विक सद्‌गुणांची वाढ होते.

ईयोबाच्या मित्रांनी त्याच्या विरूद्ध आरोप केले त्यावरून केवळ रागावल्याने कोणाचेच भले होत नाही हे समजते ईयोबाच्या मूर्ख मित्रांसारखे लोकांनी चांगले वागावे असा दबाव काही मेंढपाळ त्यांच्यावर आणतात त्याच्या मित्रांनी काय केले ते पाहा. ते ईयोबावर चिडले आणि तोच अपराधी आहे असे त्याला पटवून देण्याचा प्रयत्न केला. याउलट ख्रिस्ती लोकांनी काय केले पाहिजे तर लोकांना देवाची ओळख करून दिली पाहिजे, त्यासाठी मदत केली पाहिजे आणि पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याने एकमेकांची सेवा केली पाहिजे.



**ईयोबाच्या पुस्तकातील अध्याय 1 मध्ये पुढील सत्ये पाहा:**

प्रकटी 12:10 ह्या वचनात सैतानाला 'आमच्या बंधूंना दोष देणारा' असे का म्हटले आहे?

ईयोबाचा विश्वास व शीलस्वभावाची परीक्षा धेण्यासाठी देवाने सैतानाला कशाची परवानगी दिली.

**अध्याय 2 मध्ये पाहा:**

देवाने ईयोबाला आणखी त्रास देण्याची परवानगी सैतानाला दिली.

ईयोबाच्या सांत्वनाला आलेल्या त्याच्या तीन मित्रांची नावे.

**अध्याय 3 मध्ये** पाहा आपल्या जन्म दिवसाचे काय व्हावे अशी इच्छा ईयोब व्यक्त करतो.

**अध्याय 4 व 5 मध्ये** पाहा ईयोबाच्या दु:खाचे कोणते कारण अलीफज सांगतो.

*(उत्तर: पाहा 4:7-8 बरेचसे लोक इतरांवर आरोप करतात आणि त्यांचा न्याय करतात, ईयोबाच्या ठायी काही तरी दुष्टपणा आहे आणि त्यामुळेच देव त्याला शिक्षा करीत आहे अशी चुकीची समजूत अलीफजने करून घेतली)*

**अध्याय 6-11 मध्ये शोधा:**

6:21-30 ह्या वचनांत ईयोबाने अलीफजच्या सल्लामसलतीवर केलेला विचार

अध्याय 8 मध्ये बिल्ददला ईयोबने दिलेल्या उत्तरा बद्दल काय वाटले (पाहा वचन 2)

अध्याय 9-10 मध्ये ईयोबने आपल्या जीवना विषयी कोणते विचार व्यक्त केले

10:20-22 ह्या वचनात आपल्या मित्रांनी काय करावे अशी ईयोबची अपेक्षा आहे.

अध्याय 11 मध्ये ईयोबच्या दु:खाचे कोणते कारण असावे असे सोफरला वाटले (पाहा वचने 13-15)

ईयोब 12:1-3 ह्या वचनांमध्ये ईयोबला त्याच्या तीन मित्रांनी दिलेल्या सल्ल्याबद्दल काय वाटले.

**अध्याय 12-31** मध्ये चार माणसे दुसाऱ्यांदा वादविवाद करतात: पाहा:

12:1-3 ह्या वचनांमध्ये ईयोबला त्याच्या तीन मित्रांनी दिलेल्या सल्ल्याबद्दल काय वाटले.

19:23-27 ह्या वचनांमध्ये ईयोबची अखेरची आशा.

**अध्याय 38-41** मध्ये परमेश्वर वावटळीतून बोलला, त्याने ईयोबला कठीण प्रश्न विचारले. पाहा:



38:1-3 ह्या वचनांमध्ये परमेश्वराला तीन वयोबृद्ध सल्लागारांबद्दल काय वाटले.

38:4-5 ह्या वचनांत परमेश्वर ईयोबला काय विचारतो, ईयोबचे अज्ञान प्रकट करायला सांगतो.

**अध्याय 32-37** मध्ये अलीफज येतो तो तिधा वयोवृद्ध मनुष्यांवर का रागावला ते 32:3-10 ह्या वचनांत पाहा.

**अध्याय 42** अंतिम परिणाम प्रकट करतो. पाहा:

42:1-6 ह्या वचनांत ईयोबला स्वत:बद्दल आणि त्याच्या बदललेल्या दृष्टीकोना विषयी काय वाटले.

42:7-8 ह्या वचनांत परमेश्वराला तिघा वयोवृद्ध मनुष्यांचा राग का आला आणि त्याने त्यांना काय करायला सांगितले.

42:10-17 ह्या वचनांत अंतिम परिणाम काय होते.

ख्रिस्तासाठी सहन केलेल्या दु:खाचे अनेक परिणाम 1 पेत्र 1:3-9 ह्या वचनांत पाहा.

**2. आठवडयात करावयाच्या कृतींची योजना आखा.**

लोकांना त्यांची पातके देवाजवळ कबूल करण्यास उत्तेजन द्या तसेच त्याचे सामर्थ्यशाली बदल घडवून आणणारे सामर्थ्य मागण्यास सांगा.

**3. सहकाऱ्यांशी चर्चा करून येणाऱ्या उपासनेची योजना आखा.**

मुलांना, नाट्यीकरण सादर करण्यास आणि दावीद शौलाला क्षमा करतो यावर त्यांनी तयार केलेले प्रश्न विचारण्यास सांगा.

ईयोबमधील (भाग1) महत्वाच्या गोष्टी सांगा किंवा नाटकातून दाखवा. तुम्हांला समजलेल्या गोष्टींविषयी प्रश्न विचारा.

या गोष्टींवर चर्चा करणे, प्रार्थना करणे कार्यकृतींची योजना करणे आणि एकमेकाना मदत करणे यासाठी लहान लहान गट तयार करा.



**पाठ करा गलती 5:22-23.**

प्रभुभोजनाची ओळख करून देण्यासाठी ईयोबने त्याच्या सल्लागारांसाठी होमबलीचे अर्पण कसे केले ते सांगा, ईयोब 42:7-8 ख्रिस्ताचे रक्त आमची सर्व वाईट वागणूक झाकून टाकते हे स्पष्ट करून सांगा.

पवित्र शास्त्रानुसार 'देहाचे' जीवन कसे असते ते सांगा.

- शास्त्रलेखांमध्ये सात्विक शीलस्वभावाची जडण घडण हा सांघिक एकत्रितपणे केलेला प्रयत्न आहे. हे काम आपल्याला एकटयाने करता येत नाही.
- पवित्र आत्मा आम्हांला एकमेकांची प्रीतीने सेवा व सहाय्य करण्याकरीता आध्यात्मिक कृपादाने देतो (1 करिंथ 12 व 13 अध्याय.)
- आम्ही विश्वासणाऱ्यांच्या मंडळीत सहभागी होतो व इतरांची सेवा करतो तेव्हा आमचा शीलस्वभाव घडतो. उदाहरणार्थ, दारू पिणारे लोक जेव्हा इतरांना दारू सोडण्यास मदत करतात तेव्हा त्यांचेही हे व्यसन सहजपणे सुटते.

काही लोंका मध्ये नेहामीच्या परिचित प्राण्यांचे वाईट व चांगले गुण पहायला मिळतात हे सांगा.

| **काही लोक असे वागतात** | **त्यांनी पवित्र आत्म्याकडे दुर्लक्ष केले तेव्हा.....** | **ते पवित्र आत्म्याने परिपूर्ण झाले तेव्हा....** |
|---|---|---|
|  | स्तेफनला दगडमार करून जिवे मारण्यात पौलाचा सहभाग होता आणि त्याने विश्वासणाऱ्यांचा छळ केला. | नंतर पौलाने कळपाला विरोधाचा सामना केला, मेंढपाळांना प्राशिक्षण दिले आणि इतर वंशांच्या लोकांपर्यन्त वचन नेले. |
| **भुंकणारी कुत्र्याची पिल्ले; पेत्रासारखी**  | पेत्र बरेचदा उतावीळपणाने बोलत असे, येशूच्या मरणाच्या योजनेला त्याने विरोध केला तसेच त्याला ओळखत असल्याचेही नाकारले. | नंतर पेत्राने सामर्थ्याने येशूची घोषणा केली आणि अनेकांना पश्चाताप करून विश्वासात येण्याची प्रेरणा दिली. |
| **दूरवरचे पाहणारे गरूड, दावीदासारखे:**  | दावीदाने लबाडी करून आपल्या सैन्याची मोजणी केली, त्यामुळे त्याच्यावर पीडा आली तसेच त्याने उरीयाच्या पत्नीची हाव धरली. | दावीदाने सुंदर स्तोत्रे लिहिली, नवे मंदीर बांधण्याच्या योजना आखल्या आणि चिरस्थायी राज्यावर विश्वास ठेवला. |
| **नेटाने काम करणारे घोडे, ईयोबसारखे:**  | देवाने ईयोबवर घोर संकटे दुःखे येऊ दिली म्हणून त्याने देवाला प्रश्न विचारले तसेच बराच वाद घातला. | तथापि, घोर संकटांतही ईयोबने देवावर ठाम विश्वास ठेवाला आणि त्याने विचारलेल्या प्रश्नांबद्दल त्याने पश्चाताप केला. |

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net